—: प्रेसनोट :—                दि. ०५/१०/२०२०

**यातील फिर्यादी यांचे रहाते घराची दुरुस्ती व बांधकाम करण्यासाठी यातील आलोसे यांनी फिर्यादीकडे रु.२५,०००/— रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु.२०,०००/—लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोद.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १४/२०२० |
| कलम | ७, १२ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १) सुभाष शिवराम राउत वय ५४, पद — मुकादम, म.न.पा., जी. नॉर्थ वार्ड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई<br>२) बासवानी तुकाराम नौकुडकर, वय ५२ वर्षे — वाहन स्वच्छक, म.न.पा. जी. नॉर्थ वार्ड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २५,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. २०,०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे धारावी ६० फुट परिसरात रहात असुन ते रहात असलेले घर दुरुस्ती करुन बांधकाम करीत होते. सदरचे बांधकाम अनधिकृत असुन कारवाई करावयाची नसल्यास आलोसे न. १ यांनी फिर्यादीकडे रु.२५,०००/— रक्कमेची मागणी केली.<br>सदरची रक्कम फिर्यादीस लोकसेवक यांना दयावयाची नसल्याने फिर्यादीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन पडताळणी केली असता, आलोसे न. १ यांनी फिर्यादी यांच्या घराच्या दुरुस्तीच्या बांधकामावर कारवाई न करण्यासाठी रु. २५,०००/— रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यावरुन आज दि.०५/१०/२०२० रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे न. १ यांनी रु.२०,०००/— लाचेची रक्कम स्विकारुन सोबत असलेले आलोसे न.२ यांच्याकडे दिली. आलोसे न.२ यांनी सदर लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या खिश्यात ठेवली असता दोन्ही लोकसेवकाना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

5/10/20

( निलम वाव्हळ )
सहायक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००